कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसूचना/ २५४ /२०२५ दि. १७/११/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कापुरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **दिनांक १७/११/२०२५ रोजी रात्रौ ००:०० वा. पासुन ते दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ०५:३० वा. पावेतो** शेठ वसंत लॉन्स, बिल्डींग नं.९ वर टॉवर क्रेन बसविण्यात येणार असुन सदरवेळी टी.सी.एस. रोडवर मोबाईल क्रेन उभी करून काम करण्यात येणार आहे. सदर वेळी पोखरण रोड नंबर ०२ कडून टीसीएस मार्गे विवियाना मॉलकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) गांधीनगर–पोखरण रोड नं.२ या रोडने टी.सी.एस.कंपनी समोरील कट येथुन उजवीकडे वळण घेवुन टी.सी.एस. समोरून, विवियांना मॉलकडे अथवा लोढा कासा अल्टीमा, आय थींगक लोढा, कॉल सेंटरकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहतुकीस **टी.सी.एस.कंपनी समोरील कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारी वाहतुक ही सरळ पुढे जावुन रवि स्टील नाका येथुन उजवीकडे वळण घेवुन, ज्युपीटर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) हरदासनगर कट येथुन,पुढे सरळ येवुन,टी.सी.एस.समोरून डावे बाजुस वळण घेवुन विवियांना मॉलकडे अथवा लोढा कासा अल्टीमा,आय थींगक लोढा,कॉल सेंटरकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहतुकीस **हरदासनगर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारी वाहतुक ही विवियांना मॉल समोरून उत्सव हॉटेल येथुन इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १७/११/२०२५ रोजी रात्रौ ००:०० वा. पासुन ते दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ०५:३० वा. पावेतो** रोजी वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक
प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.